RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक १३६] गुरुवार, ऑक्टोबर ३०, २०२५/कार्तिक ८, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४७३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक आरोग्य विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय, संकुल इमारत, १० वा मजला, नवीन मंत्रालय,
मुंबई ४०० ००१, दिनांक ३० ऑक्टोबर २०२५.

**अधिसूचना**

**साथरोग अधिनियम.**

क्रमांक कुनिका-१२२५/प्र.क्र.१७/संसआ-२.— ज्याअर्थी, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, भारत सरकार यांनी त्यांच्या अ.शा. पत्र क्रमांक झेड-१४०२०/०५/२०२५-एलईपी., दिनांक १४ मे २०२५ द्वारे, कळविले आहे की, जागतिक कुष्ठरोग धोरण २०२१-२०३० शी सुसंगत, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने, राज्यातील निदान झालेल्या सर्व प्रकरणांचे अहवाल अनिवार्यपणे देऊन कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्याच्या दिशेने होत असलेल्या प्रगतीला चालना देण्यासाठी राष्ट्रीय धोरणात्मक योजना २०२३-२०२७ चा प्रारंभ केला आहे आणि राज्यात कुष्ठरोगाला "अधिसूचित आजार" म्हणून घोषित करण्याचे विचारात घेणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, कुष्ठरोग हा एक संसर्गजन्य आजार असून देशातील एक प्रमुख सार्वजनिक आरोग्य समस्या आहे. जर त्याचे लवकर निदान झाले नाही आणि लवकर उपचार केले नाहीत तर, त्यामुळे, शारीरिक व्यंग, विकलांगता व लक्षणीय आजार होऊ शकतात. हा आजार सामाजिक कलंक आणि भेदभावाशी देखील संबंधित आहे;

आणि ज्याअर्थी, कुष्ठरोग हा बहुविध औषधोपचाराच्या (एमडीटी) पूर्ण उपचारांमुळे बरा होणारा आजार असून लवकर निदान आणि त्यानंतर पूर्ण उपचार हा कुष्ठरोग प्रतिबंध आणि नियंत्रण धोरणाचा आधारस्तंभ आहे;

आणि ज्याअर्थी, राज्य शासन, कुष्ठरोगाचे प्रमाण कमी करण्यास वचनबद्ध आहे आणि शासनाने, सलग पाच वर्षांमध्ये देशात एकही कुष्ठरोगी बालक नसल्यास आणि त्यानंतर पुढील तीन वर्षांमध्ये एकही कुष्ठरोगी नसल्यास दिला जाणारा “कुष्ठरोगमुक्त दर्जा” प्राप्त करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे;

आणि ज्याअर्थी, हे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील डॉक्टर, विकृतिशास्त्रज्ञ, सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ व आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांसह सर्व आरोग्य कर्मचारी व क्षेत्रीय कार्याधिकारी यांनी कुष्ठरोग झाल्याचे निश्चित झालेल्या सर्व रुग्णांना योग्य

उपचार, पाठपुरावा केल्याचा आणि कुष्ठरोगाचा संसर्ग झालेल्या व्यक्तींना पोस्ट-एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस (पीईपी) चा उपचार देण्यात आला असेल त्याबाबतचा अहवाल देणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाला असे वाटते की, वेळीच प्रतिबंध आणि प्रभावी रोग व्यवस्थापन याची सुनिश्‍चिती करण्यासाठी, कुष्ठरोगाचे निदान झालेले सर्व रुग्ण, योग्य प्राधिकाऱ्यांना कळविणे अनिवार्य आहे. सर्वांगीण आणि वेळेत अहवाल दिल्यास, राज्य शासनास, पुढील बाबी शक्य होतील :-

१. राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम (एनएलईपी) अंतर्गत सर्व रुग्णांना सेवा मिळतील याची सुनिश्‍चिती करणे.

२. उपचारानंतर गुंतागुंत किंवा विकृती निर्माण झालेल्या व्यक्तींची पुढील काळजी घेण्यासाठी पाठपुरावा करणे.

३. पुढील संक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी निरोगी संपर्कांना केमोप्रोफिलॅक्सिस देणे सुलभ करणे.

४. औषध प्रतिरोधक कुष्ठरोग (डीआरएल) रुग्णांचे निदान आणि व्यवस्थापनास सहाय्य करणे.

त्याअर्थी, आता, साथरोग अधिनियम, १८९७ (१८९७ चा ३) याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) अनुसार आणि सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी, महाराष्ट्र शासन, याद्वारे, असे घोषित करत आहे की -

(एक) कुष्ठरोग या आजाराला महाराष्ट्र राज्यात अधिसूचित आजार म्हणून घोषित करण्यात येत आहे;

(दोन) ही अधिसूचना, शासकीय, खाजगी, अशासकीय संस्था, खाजगी आरोग्य सेवा पुरवठादार व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांसह वैद्यकीय संस्था इत्यादी सर्व क्षेत्रांना लागू राहील;

(तीन) कुष्ठरोगाचे निदान झालेल्या सर्व रुग्णांचे अहवाल, निदान झाल्यानंतर अनिवार्यपणे दोन आठवड्यांच्या आत अनुक्रमे सहायक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग), जिल्हा आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी, पर्यवेक्षीय नागरी कुष्ठरोग पथक, संबंधित जिल्ह्याचे नगरपालिका/महानगर आरोग्य अधिकारी यांना सादर करणे आवश्यक राहील;

(चार) रुग्णांचा अहवाल देणाऱ्या किंवा अधिसूचित करणाऱ्या सर्व व्यक्तींनी किंवा संस्थांनी, एक विहित नोंदवही ठेवावी व त्यांच्या देखरेखीखाली सर्व नवीन किंवा सद्यस्थितीतील रुग्णांसाठी सादर केलेल्या अहवालाची एक प्रत ठेवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**निपुण विनायक,**
शासनाचे सचिव.

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

Gokuldas Tejpal Hospital Complex Building, 10th Floor,
New Mantralaya, Mumbai 400 001, Dated the 30th October 2025.

*NOTIFICATION*

Epidemic Diseases Act.

No. KUNIKA-1225/C.R.17/CD-2.—Whereas, the Government of India, Ministry of Health and Family Welfare, Department of Health and Family Welfare *vide* its letter number D. O. No. Z -14020/05/2025-Lep., dated the 14th May 2025 has communicated that, in alignment with the Global Leprosy Strategy 2021-2030, the Ministry of Health and Family Welfare has launched the National Strategic Plan 2023-2027 to accelerate progress towards interrupting the transmission of Leprosy by mandatory reporting of all diagnosed cases in the State and to consider declaring Leprosy as a “Notifiable Disease” in the State;

And Whereas, Leprosy is an infectious disease and continuous to be a major public health concern in the country. If not diagnosed and treated early, it may leads to physical deformity, disability and significant morbidity. It is also associated with social stigma and discrimination;

And Whereas, Leprosy is a curable disease with full course of Multi Drug Therapy (MDT) and early diagnosis followed by complete treatment is the cornerstone of the Leprosy Prevention and Control Strategy;

And Whereas, the State Government is committed to reducing the Leprosy burden and aims to achieve leprosy free status, defined as the absence of indigenous child cases for five consecutive years and subsequently nil Leprosy cases for the next three years;

And Whereas, in order to attain this goal, it is essential that all health personnel and field functionaries-including doctors, pathologists, microbiologists and health care workers in both the public and private sectors - report all identified cases of Leprosy for appropriate treatment, follow-up and administration of Leprosy Post Exposure Prophylaxis (PEP) to contacts;

And whereas, the Government of Maharashtra deems it imperative that all diagnosed cases of Leprosy be mandatorily reported to the appropriate authority to ensure early intervention and effective disease management. Comprehensive and timely reporting will enable the State to :-

1. Ensure that all patients shall avail services under the National Leprosy Eradication Programme (NLEP)

2. Provide follow-up care to individuals who develop complications or disabilities post-treatment.

3. Facilitate the administration of chemoprophylaxis to healthy contacts to prevent further transmission.

4. Support the diagnosis and management of Drug Resistant Leprosy (DRL) cases.

Now, therefore, in pursuance of sub-section (*1*) of Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897 (3 of 1897) and in the interest of public health, the Government of Maharashtra hereby declares that.—

i. The Leprosy is declared as a notifiable disease in the State of Maharashtra;

ii. This notification shall be applicable to all the Sectors, Government, Private, Non-Government Organizations, Corporate Healthcare providers and Medical Institutions, including Private Medical Colleges ;

iii. All diagnosed cases of Leprosy must be mandatorily reported to the Assistant Director, Health Services (Leprosy), District Health Officer and Medical Officer, Supervisory Urban Leprosy Team, Municipal/Metropolitan Health Officers of the respective district within two weeks of diagnosis;

iv. All individuals or institutions reporting or notifying cases shall maintain a prescribed register and retain a copy of the submitted reporting format for all new or ongoing cases under their care.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NIPUN VINAYAK,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.